# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२५/M/००२५४१**

**अपिलार्थी श्री. दिलीप वसंत कुंभार**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी**

मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
प्रशासकीय इमारत, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१

**प्रथम अपिलीय अधिकारी**

मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
प्रशासकीय इमारत, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१

**<u>द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २५.०८.२०२६</u>**

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १५.०७.२०२५ | २९.०७.२०२५ | २९.०८.२०२५ | - |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०६.१०.२०२५ रोजीच्या अर्जान्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. २९.०७.२०२५ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थींनी दि. १५.०७.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार In 2017 Mahaonline Ltd, conducted a door-to-door survey on behalf of the Shum Rehabetation Authors Mumbai and collected various documents during this survey from each and every flat owner from all the rehab buildings no. A-1 to 1-14, which are situated at Bindra Complex, CTS no. 581, 582, 584 to 592. Village-Kondivita. Mahakali Caves Road, Tal. Andheri East, Dist. Mumbai Suburban Please provide me the above door-to-door survey report and documents collected from each and every flat owner on my pen drive Please provide the website link, where this information is already made available to the pushe, as proactive disclosure under section 4 of the RTI Act बाबत माहिती विचारली होती. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग यांनी अपिलार्थींना दि. २९.०७.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविले की, आपल्या अर्जातील विषय हा मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई यांच्या कार्यालयाशी संबंधित असल्याने सदर माहिती अर्ज संबंधित कार्यालयाकडे हस्तांतरित करण्यात येत आहे. अपिलार्थींचे समाधान न झाल्याने त्यांनी

..२/-

दि.२९.०८.२०२५ रोजी प्रथम अपील दाखल केले.

३. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. सदर प्रकरणी कोणतेही आदेश पारित करण्याअगोदर जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची उपस्थिती आवश्यक आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

पुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थींना आवश्यक असलेल्या माहितीसह उपस्थित रहावे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ०३.०९.२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission
Greater Mumbai

27-8-2026

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : २७.०८.२०२६**